५.००
१६-५-२०२३

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : १६/०५/२०२३

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

### पावसाळयापुर्वी नाले सफाई कामकाजास सुरुवात

मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अजिज शेख यांच्या मार्गदर्शनाखाली उल्हासनगर महानगरपालिका हद्दितील मोठया नाल्यांची मशिनरीद्वारे व अंतर्गत नाल्यांची मनुष्यबळाद्वारे साफ सफाई करुन घेणेकरिता आज दि. १६/०५/२०२३ रोजी पासून उल्हासनगर रेल्वे स्टेशन लगत असलेली वालधुनी नदीचे पात्रातील गाळ मशिनरीद्वारे काढून नदिचे संवर्धन करणेचे कामाचा शुभारंभ करण्यात आलेला आहे. सदर वेळी मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अजिज शेख यांनी दिलेल्या सुचनांनुसार अतिरिक्त आयुक्त (सेवा) डॉ. करुणा जुईकर यांच्या शुभहस्ते उदघाटन करण्यात आलेले असून, सदर वेळी श्री. सुभाष जाधव, उप आयुक्त (आरोग्य) श्री. किरण भिलारे, मुख्य लेखा अधिकारी, श्री. मनिष हिवरे, सहा. सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. एकनाथ पवार व श्री. विनोद केणे मुख्य स्वच्छता निरीक्षक, नदी संवर्धन बिरादरीचे, श्री. शशिकांत दायमा, श्री. शिवाजी रगडे व इतर तेसच कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. कंपनीचे (ठेकेदार) यांचे प्रतिनिधी सदर उद्घाटन प्रसंगी उपस्थित होते .

उदघाटनानंतर लगेच नदी संवर्धन अंतर्गत गाळ व कचरा काढण्याचे काम पोकलेन मशिनद्वारे सुरु करण्यात आलेले आहे. त्यामुळे पावसाळयात नदीच्या पात्रालगत असलेल्या क्षेत्रात पाणी साठणार नाही. तसेच पुरपरिस्थिती सारखी आपत्ती टाळण्यास मदत होवून शहराची प्रतिमा सुंदर व स्वच्छ राखण्यासाठी मदत होणार आहे.

16/5/23

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.